**ठळक बातम्या**

- नव्या वक्फ कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी
- या शैक्षणिक वर्षापासून पहिलीसाठी CBSE आधारित अभ्यासक्रम लागू करण्याचा शासन आदेश जारी
- आगामी सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची शिफारस
- २४ कॅरेट सोन्याचे दर पहिल्यांदाच ९७ हजारांच्या पलीकडे, चांदी १ लाखाच्या उंबरठ्यावर

**आणि**

- पंचवटी आणि जनशताब्दी एक्स्प्रेसमध्ये ATM सुरू

<><><><><>

नव्या वक्फ कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयानं आज कोणताही हंगामी आदेश जारी केला नाही. या कायद्याविषयी सर्वोच्च न्यायालयानं उपस्थित केलेल्या तीन मुद्यांवर आपला युक्तिवाद तयार करण्यासाठी केंद्रसरकारनं अधिक वेळ मागून घेतल्यामुळे या प्रकरणाची सुनावणी आता उद्या होईल.

या कायद्याला आवाहन देणाऱ्या याचिकांवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या पीठानं आज सुनावणी घेतली.

ज्या मालमत्तांना न्यायलयानं वक्फ म्हणून जाहीर केलं आहे. त्या कायदेशीर व्यवहारानं असोत किंवा वहिवाटीनं वक्फ मालमत्ता असोत, त्यांना बेदखल करता येणार नाही, असं न्यायालयानं सांगितलं. वहिवाटीनं

मालमत्ता असलेल्या वक्फच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्र बहुतेकांकडे असणार नाहीत, त्यांना बेदखल कसं करता येईल, असा सवाल न्यायालयानं सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केला. सदर मालमत्ता ही सरकारी जमीन आहे का? याबाबत जिल्हाधिकारी चौकशी करत असताना तिचा वक्फ म्हणून विचार केला जाणार नाही अशी अशी तरतूद नव्या कायद्यात आहे, ती लागू होणार नाही, असा आदेश आपण देऊ असं न्यायालयानं सांगितलं. वक्फ मंडळामधे आणि केंद्रीय वक्फ समितीमधे पदसिद्ध सदस्य वगळता इतर सर्व सदस्य मुस्लीम असतील, असा आदेशही आपण देऊ, असं न्यायालयानं सांगितलं. त्यावर सरकारनं युक्तिवादासाठी वेळ मागून घेतल्यामुळे हंगामी आदेश आज जारी झाला नाही, आणि शेवटी उद्या सुनावणी सुरु ठेवण्याचा निर्णय न्यायालयानं घेतला.

<><><><><>

राज्यात सीबीएसईच्या धर्तीवर नवीन अभ्यासक्रम लागू करण्याचा शासन आदेश आज जारी झाला. या शैक्षणिक वर्षापासून पहिलीसाठी, पुढच्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि ६वीसाठी, २०२७-२८ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पाचवी, सातवी, ९वी आणि ११ वीसाठी तसंच २०२८-२९ ला इयत्ता ८ वी, दहावी आणि बारावीसाठी CBSE अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधे हिंदी भाषा अनिवार्य असेल. तर अन्य माध्यमांच्या शाळांमधे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी अभ्यासक्रमाच्या भाषेशिवाय मराठी आणि इंग्रजी या भाषा अभ्यासल्या जातील.

आधीच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक या स्तराऐवजी नव्या शैक्षणिक धोरणानुसार पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, पूर्व माध्यमिक स्तर आणि माध्यमिक स्तर अशी रचना करण्यात आली आहे.

या धोरणा अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने NCERT वर आधारित तयार केलेल्या पुस्तकांचा वापर राज्यात केला जाईल. NCERT आधारित पुस्तकांचा वापर याआधी २३ राज्यांकडून केला जात आहे.

<><><><><>

शैक्षणिक सुविधांचे लोकाभिमुखीकरण करण्यासाठी देशातले पहिले महाज्ञानदीप डिजिटल शिक्षण पोर्टल सुरू झाल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज दिली. त्यांच्या हस्ते मंत्रालयात पोर्टलचा या शुभारंभ करण्यात आला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत 'भारतीय ज्ञान प्रणाली – जेनेरिक' हा अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार केला असून हा अभ्यासक्रम या पोर्टलवर जगभरातल्या विद्यार्थ्यांसाठी एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. महाज्ञानदीप या उपक्रमांतर्गत भव्य ओपन ऑनलाईन कोर्सच्या माध्यमातून एक हजार तज्ज्ञ प्राध्यापक घडवण्याचा संकल्प असून आतापर्यंत १५० प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात आलं आहे.

<><><><><>

अमरावती विमानतळाचं लोकार्पण आज केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री के राममोहन नायडू, आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, अमरावतीच्या विकासाला या विमानतळामुळे चालना मिळणार असून वैमानिक प्रशिक्षण केंद्रातून अनेक विद्यार्थ्यांचं वैमानिक होण्याचं स्वप्न पूर्ण होणार आहे. विमानतळावरच्या प्रवासी सेवेलाही प्रारंभ झाला असून पहिलं विमान धावपट्टीवर उतरलं.

<><><><>

लांब पल्ल्याच्या प्रवासादरम्यान एसटी बसेस थांबत असलेल्या हॉटेल-मोटेल थांब्यावर प्रवाशांना आरोग्यदायी आणि किफायतशीर सुविधा मिळत नसतील तर असे थांबे रद्द करण्याचे निर्देश परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. या संदर्भात सध्या सुरू असलेल्या सर्व थांब्याचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल १५ दिवसात सादर करण्याच्या सूचना देखील त्यांनी एस. टी. महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांना केल्या आहेत.

<><><><>

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी भारताचे पुढील सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नावाची शिफारस केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे केली आहे. गवई सध्या सर्वोच्च न्यायालयाचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. सरन्यायाधीश न्यायमूर्ती खन्ना १३ मे रोजी सेवानिवृत्त होणार आहे. मंत्रालयाच्या मंजुरीनंतर न्यायमूर्ती गवई हे भारताचे ५२ वे सरन्यायाधीश होतील.

<><><><>

दररोज उच्चांकी पातळी गाठण्याची चढाओढ सोन्या-चांदीच्या दरात आजही कायम राहिली. त्यामुळं सोनं आणि चांदी आज सुमारे दीड हजार रुपयांनी

महाग झालं. मुंबईच्या बाजारपेठेत २४ कॅरेट सोनं ९७ हजार ४१७ रुपये तोळा, २२ कॅरेट सोनं ९५ हजार रुपये तोळा, तर चांदी सुमारे ९९ हजार ५०० रुपये किलो दराने मिळत होती.

भारतीय वायदे बाजारात सोन्यानं पहिल्यांदाच ९५ हजार रुपयांची पातळी ओलांडली. अमेरिकी वायदे बाजारात पहिल्यांदाच सोन्याचे दर ३ हजार ३०० डॉलर प्रति औंस या दराच्या पलीकडे गेले आहेत.

**<><><><><>**

चालत्या रेल्वेगाडीत स्वच्छता गृह, उपाहारगृह अशा सुविधा आपण पाहिल्या आहेत. आता रेल्वेने प्रवास करता करता एटीएम यंत्र वापरणं शक्य  आहे. कसं ते ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड – व्हॉईस कास्ट**

*मुंबई - मनमाड मार्गावर धावणारी एटीएम सुविधा उपलब्ध असलेली पंचवटी एक्सप्रेस ही देशातली पहिली रेल्वे गाडी बनली आहे. मध्य रेल्वेचा  भुसावळ विभाग आणि बँक ऑफ महाराष्ट्राच्या सहकार्याने ही सुविधा वातानुकूलित डब्यात लावण्यात आली असून त्याची चाचणी आज यशस्वी झाली, मात्र इगतपुरी ते कसारा दरम्यान बोगद्यांमधे संपर्क कमकुवत असल्याने काहीशा अडचणी आहेत. हे एटीएम वातानुकूलित डब्यात बसवलं असलं तरी सर्व डब्यातल्या प्रवाशांना तिथं पोहोचता येईल. रोख रक्कम काढण्याबरोबरच चेकबुकाची मागणी नोंदवणं आणि खात्याची स्टेटमेंट्स मिळवणंही शक्य होईल. एटीएमवर २४ तास चालणारे CCTV कॅमेरे बसवून सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली आहे. इतर गाड्यांमधे देखील ही सुविधा उपलब्ध करुन देण्याचाही रेल्वेचा प्रयत्न आहे.*

**<><><><><>**

छत्रपती शिवरायांविषयी एवढीच कळकळ असेल तर संपूर्ण देशात शिवजयंतीची सुट्टी जाहीर करा. त्याचप्रमाणे राजभवनात शिवस्मारक उभारा असे आवाहन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं. नाशिकमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या निर्धार मेळाव्यात ते बोलत होते.
वक्फ कायद्यात दुरुस्ती करताना आपण हिंदुत्ववादी असल्याचा दावा करणारा करणाऱ्या भाजपाने ईदच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजाला सौगात ए मोदी वाटली. मात्र श्रीराम जयंती किंवा हनुमान जयंतीला हिंदू समाजाच्या कोणत्या घरांना भेटी दिल्या असा प्रश्न त्यांनी विचारला. आमच्या पक्षानं कोणत्याही प्रकारे हिंदुत्व सोडलेलं नाही. राज्यात मराठी म्हणून तर देशामध्ये हिंदुत्ववादी म्हणूनच आम्ही ओळखले जातो, असं ते म्हणाले. राज्यात पुन्हा मतपत्रिकांच्याद्वारे मतदान घेतलं तर सत्तेत येऊ असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस पडला. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.
विदर्भात आज वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. संपूर्ण विदर्भात आज तर विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्याच्या काही भागात उद्या हवामान विभागानं पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**